# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**प्रेस नोट**

दिनांक 13/01/2022 (गुरूवार)

(सायंकाळ)

---

### सावनेर येथील जबरी चोरीतील आरोपी गजाआड
### स्थानिक गुन्हे शाखा व सावनेर पोलीसांची संयुक्त कारवाई

दिनांक 11/01/2022 रोजी दुपारी 12.30वा. चे सुमारास फियादी नामे श्री. आनंदराव महादेव येलेकर, वय 65 वर्ष, रा. तेलंगखेडी, सावनेर हे तहसिल कार्यालय सावनेर कडे जाणा–या रोडने जात असतांना एका अनोळखी इसमाने त्यांना थांबवुन तंबाखु खाणे करीता चुना मागीतला, तो फिर्यादी यांचे कडे नसल्याने त्यांनी दिला नाही म्हणुन त्या अनोळखी इसमाने फिर्यादीचे बनियान चे खिशात बळजबरीने हात घालुन खिशातील नगदी 10,000/–रू हिसकावुन पळुन गेला. सदर घटने बाबत पोलीस स्टेशन सावनेर येथे अप.क्र. 12/2022 कलम 392 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. नमुद गुन्हयातील अनोळखी आरोपी तपासा दरम्यान निष्पन्न करून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व सावनेर पोलीसांनी दिनांक 12/01/2022 रोजी मिळालेल्या गोपनिय माहीतीच्या आधारे पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत सापळा रचुन इसम नामे योगेश यशवंत कमाले, वय 23 वर्ष, रा. पहलेपार, सावनेर यास यास संयुक्तरित्या ताब्यात घेण्यात घेतले. विचारपुस दरम्यान त्याने सदरचा गुन्हा केल्याचे सांगीतले आहे. नमुद आरोपी हा सध्या पोस्टे सावनेर ताब्यात असुन पुढील तपास सावनेर पोलीस करीत आहेत.

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. विजयकुमार मगर नागपुर ग्रामीण, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर ना. ग्रा., उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, सपोनि राजीव कर्मलवार, पोहवा राजेंद्र रेवतकर, पोना आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, रोहन डाखोरे, विपीन गायधने, अमोल वाघ चालक अमोल कुथे तसेच पोलीस स्टेशन सावनेर येथील सपोनि सतीष पाटील, सपोनि शिवाजी नागवे, पोउपनि सागर करांडे, पोना निलेश तायडे, प्रकाश ठोके, पोशि अशोक निस्ताने, सचिन लोणारे व सायबर सेल चे सतिष राठोड यांनी संयुक्तरित्या पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर